# मुख्य कार्यालय, विरार
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२१/०५/२०२६

*मा.महापौर व मा.उप-महापौर यांनी केली नालेसफाई कामांची पाहणी*

शहरात आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पाणी तुंबणे, पूरस्थिती तसेच अस्वच्छतेचा सामना करावा लागू नये, यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत विविध भागांमध्ये नालेसफाईची कामे युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहेत. या कामांची प्रत्यक्ष पाहणी मा.महापौर श्री.अजीव पाटील व मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस यांनी दिनांक २१ मे २०२६ रोजी संबंधित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसमवेत केली.

यावेळी सनसिटी वसई (प.), गास, निर्मळ परीसर इ.ठिकाणी सुरु असलेल्या नालेसफाईच्या कामांची तसेच गटारे व पाणी निचरा होणाऱ्या ठिकाणांची पाहणी करण्यात आली. नाल्यांमध्ये साचलेला गाळ, प्लास्टिक कचरा व इतर अडथळे तत्काळ हटविण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या. तसेच पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची संपूर्ण साफसफाई पूर्ण करून पाणी निचरा सुरळीत राहील याची दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले. यावेळी सदर परिसरातील तलावांचीही पाहणी करण्यात आली व तलाव स्वच्छ करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

मा.महापौर यांनी यावेळी सांगितले की, नागरिकांच्या सुरक्षिततेला व आरोग्याला प्राधान्य देत महानगरपालिका प्रशासन सर्व आवश्यक उपाययोजना करीत आहे. नालेसफाईची कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावीत यासाठी प्रशासनावर सातत्याने देखरेख ठेवण्यात येणार आहे.
मा.उप-महापौर यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, नाल्यांमध्ये कचरा टाकू नये तसेच परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महानगरपालिकेस सहकार्य करावे. नागरिकांच्या सहभागामुळे शहर अधिक स्वच्छ व सुरक्षित राहण्यास मदत होणार आहे.

या पाहणी दौऱ्यावेळी मा.नगरसेवक श्री.परेश किणी, मा.नगरसेविका श्रीम.दिप्ती भोईर, मा.नगरसेविका श्रीम.सॅरल डाबरे, माजी सरपंच श्री.सायमन अल्मेडा व श्री.सालू अल्मेडा, इतर पदाधिकारी, स्थानिक नागरिक, संबंधित विभागाचे अधिकारी, अभियंते, आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.
महानगरपालिकेमार्फत पावसाळ्यापूर्वी सर्व आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत असून, नागरिकांना कोणतीही अडचण उद्भवू नये यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.